Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# बहिणाबाई चौधरी यांच्या गाण्यातील तत्त्वज्ञान

**डॉ. म. ई. तंगावार,** मराठी विभाग, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात बहिणाबाई चौधरींच्या कविता 'बहिणाईची गाणी' या पुस्तकाच्या माध्यमातून प्रकाशित झाल्या. बहिणाबाई या शिकलेल्या नव्हत्या. त्या निरक्षर असल्या तरी अडाणी नव्हत्या. याचा प्रत्यय त्यांच्या अनेक कवितेतून येतो. शिकलेलीच माणसं तात्विक, वैचारिक चिंतन करतात असं नाही, तर न शिकलेली माणसं देखील वैश्विक स्वरूपाचे चिंतन करू शकतात. याचं एक उत्तम उदाहरण म्हणून बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेकडे पाहता येईल.

जीवनाचं व जगण्याचं अर्थ आपल्या गाण्यातुन सांगणारी बहिणाबाई या एक परिपक्व कवयित्री होत्या. तत्त्वज्ञान हे अगदी सोप्या भाषेत व्यवहारातील उदाहरण देऊन सांगता येते हे बहिणाबाई चौधरी यांनी दाखवून दिले.

घरोट (जाते) या कवितेत त्या लिहितात,

"अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पिठी
तसं तसं माझं गाणं
पोटातून येतं व्होटी "

(बहिणाईची गाणी, बहिणाबाई चौधरी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, पंधरावी आवृत्ती २०१०,पृष्ठ.१२६)
पूर्वी ग्रामीण भागात जात्यावर दळलं जात होतं. जात्याला दोन पाळू असतात. त्या दोन पाळूमध्ये दाणे भरल्यानंतर पीठ तयार होते.हे दोन पाळू म्हणजे सुखदुःखाचे प्रतीक आहेत. दिवस-रात्र याप्रमाणे प्रत्येकाच्या जीवनात सुखदुःख येत असतात. माझी कविता सहज ओठातून पोटात येत असली तरी कवितेच्या निर्मितीमागे आनंद व वेदना असते.

जन्म आणि मृत्यू या संदर्भात अध्यात्म आणि विज्ञान यामध्ये वेगवेगळया प्रकारचे चिंतन लोकांनी केले आहे. शिव जेव्हा जीवाकडे येतो तेव्हा माणसाचा जन्म होतो. जीव जेव्हा शिवाकडे जातो तेव्हा माणसाचा मृत्यू होतो.असे अध्यात्मात सांगितले गेले आहे.

या विषयावर बहिणाबाई चौधरी लिहिताना 'माझ्या जीवा' या कवितेत म्हणतात,

"आला सास, गेला सास
जीवा तुझं रे तंतर
अरे जगन मरन
एका सासाचं अंतर"
(तत्रैव, पृष्ठ.१२३)

ज्या विषयावर अनेक अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली, चिकित्सा केली. त्या विषयावर बहिणाबाई चौधरी यांनी कवितेच्या माध्यमातून एका शब्दाद्वारे चिंतन करतात. जन्म आणि मृत्यू यांच्यातला अंतर फार मोठा नसून एक श्वास आहे. अशी मांडणी त्या करतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मानवी मनाविषयी अनेक पाश्चिमात्य व भारतीय विचारवंतांनी खूप काही लिहून ठेवले आहे. माणसाचं मन वाऱ्याहून चंचल व पाण्याहून पातळ कस आहे?हे अनेकांनी सांगितलेले असले तरी बहिणाबाई अगदी साध्या सोप्या भाषेत मनाविषयी भाष्य केले आहे. मन स्थिर नाही. मोकाट, ओढाळ, जहरी व अतिशय चपळ आहे. त्याला बांधून ठेवणं अवघड आहे.

"मन मोकाट मोकाट
त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्याने चालल्या
पान्यावऱ्हल्या रे लाटा "
(तत्रैव, पृष्ठ.१२८)

मन अतिशय मतलबी व स्वार्थी आहे. त्यावर नियंत्रण ठेवणारा माणूसच खऱ्या अर्थाने आनंदाने वाटचाल करू शकतो. हे तत्त्वज्ञान बहिणाबाईच्या या कवितेत आलेले आहे.

बहिणाबाई चौधरी ग्रामीण भागातल्या असल्या तरी त्या विवेकवादी होत्या. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. त्यामुळे ज्योतिषांना हात दाखवायची काही गरज नाही. बहिणाबाई चौधरी या दैववादी नव्हत्या, तर प्रयत्नशील कवयित्री होत्या. देरे हरि पलंगावरी ही प्रवृत्ती घातक आहे.प्रत्येकाचं भविष्य प्रत्येकाला माहीत असते. अशी बहिणाबाई चौधरी यांची विचारसरणी होती. देव या संकल्पनेविषयी भाष्य करताना बहिणाबाई

'देव दिसला, देव कुठे?' या कवितेत लिहितात,

"सदा जगाच्या कारनी
चंदनापरी घसला
अरे सोतामधी त्याले
देव दिसला दिसला
(तत्रैव, पृष्ठ.१८६)

आपण आपल्या कष्टात, त्यागात ईश्वराला पाहिलं पाहिजे. जो सतत कष्ट करतो,श्रम हाच स्वर्ग मानतो, कामावर ज्याची निष्ठा आहे तोच खऱ्या अर्थाने देव माणूस असतो. असे क्रांतिकारी तत्त्वज्ञान अगदी सहज सोप्या भाषेत बहिणाबाई सांगून जातात.

बहिणाबाई चौधरी यांनी संसार या कवितेत देखील अगदी सहजपणे तत्त्वज्ञानाची पेरणी केलेली होती. ग्रामीण भागात पावसाळ्यात सहजासहजी चूल पेटत नाही. गौऱ्या , लाकडं भिजलेले असतात. स्त्रीला पुन:पुन्हा फुंकावी लागते. तेव्हाच कुठेतरी चूल पेटते. चूल पेटविण्याची गोष्ट तितकी सहज व सोपी नाही. चूल पेटल्याशिवाय तवा तापत नाही आणि तवा तापल्याशिवाय भाकरी भाजत नाही. भाकरी भाजतानाही हाताला चटके बसत असतात. तेव्हाच कुठेतरी भाकर मिळते.संसारात दिवस - रात्र याप्रमाणे सुखदु:ख येत असतात. अशा काळामध्ये संसार सोडून पळून जाणे चुकीचे आहे.संतांनी सांगितलेलेच आहे.'संसार करावा नेटका परमार्थ साधेल विवेका.' संसारात दु:ख हे पाचवीला पूजलेले. त्यावरही संयमाने व कष्टाने आपल्याला मात करता आले पाहिजे. हे तत्त्वज्ञान सांगताना बहिणाबाई म्हणतात,

"अरे संसार संसार, जसा तवा चुल्यावर
आधी हाताले चटके, तेव्हा मियते भाकर "
(तत्रैव पृष्ठ.१२१)


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

संत ज्ञानेश्वर, चांगदेव व मुक्ताबाई यांच्या जीवनातला एक प्रसंग आहे. बहिणाबाईच्या कवितेतही तो संदर्भ आलेला आहे.मानस वयाने मोठी , अनेक वर्ष जगलेली असले तरी चांगदेव संत ज्ञानेश्वरांना पत्र लिहिताना सुरुवात कशी करावी? हे कळत नसल्यामुळे कोरं पाठवतात. तेव्हा बहिणाबाई ज्ञानेश्वरांनाच पत्र लिहिण्यास सांगते. ते 'चांगदेव पासष्टी' या नावाने ओळखले जाते. मुक्ताबाई लहान असली तरी ती ज्ञानी होती. वयाने एखादा व्यक्ती जेष्ठ आहे म्हणून तो गुरु असतो असं नाही. ज्ञान व अनुभव यावर माणसाची श्रेष्ठता अवलंबून असते.असे सांगणाऱ्या बहिणाबाई ' माझी मुक्ताई ' या कवितेत लिहितात,

"माझी मुक्ताई मुक्ताई
दहा वर्साचं लेकरू
चांगदेव योगीयानं
तिले मानला रे गुरू"
(तत्रैव, पृष्ठ.१७८)

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहीत असताना प्रल्हाद केशव अत्रे म्हणतात, एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाईच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत महाराष्ट्राला लागला. शास्त्राप्रमाणे वाङ्मयात शोध क्वचितच लागतात. सोळा वर्षांपूर्वी मराठी साहित्यात असाच एक मौल्यवान शोध लागला लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतिचित्रे प्रसिद्ध झाली तेव्हा. लक्ष्मीबाई सारख्याच बहिणाईचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दाशब्दातून प्रतिमा नुसती झिरपते आहे. असे सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे. आणि मौज ही आहे की, जुन्याच चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्यांचे तेज आहे.एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने हे सारे रचलेले आहे. हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे " (तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ.०७)

माणसाला मन व बुद्धी आहे. म्हणून माणसाने फार अहंकार बाळगता कामा नये.

"अरे मी कोण मी कोण?
आला मानसाले ताठा
सर्व्या दुनियात आहे
माझ्याहून कोण मोठा?
अरे मी कोण मी कोण
माझ्या मुखी हरिनाम
तुझ्या जिभेले इचार
मधी बोले आत्माराम "
(तत्रैव, पृष्ठ.१९२)

पशु प्राण्याकडून सुद्धा खूप काही आदर्श घेण्यासारखा आहे. सुगरण पक्षी जेव्हा घरट बांधते त्या घरट्याची वीण इतकी पक्की असते ते घरटं ओढलं तरी तुटत नाही. हातपाय नसतानाही ही पक्षी घरटं कशी बांधते. याची चिंतन खोप्यामधी खोपा या कवितेच्या माध्यमातून कवयित्रींनी केले आहे.

"अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिल्लासाठी तिनं


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

झोका झाडाले टांगला
तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोट"
(तत्रैव, पृष्ठ.१४७)

बहिणाबाई चौधरी यांचे निरीक्षण जबरदस्त होते. पशु, प्राणी, निसर्ग, कुटुंब इत्यादी अनेक विषयावर मौलिक चिंतन त्यांनी केले आहे. बहिणाबाईची कविता शाळेतील अक्षर ज्ञानातून नाही, तर चिंतनातून समोर आलेली आहे. अनेक कवितेतून माणूस आणि मुकी पशु प्राणी यांची तुलना करून माणसापेक्षाही हे पशु प्राणी कसे श्रेष्ठ आहेत? हे बहिणाबाईंनी दाखवून दिले आहे. बहिणाबाईच्या कविता अजर, अमर व अक्षर आहेत. सर्वसामान्य माणसापासून ते असामान्य अशा माणसाला बहिणाबाईची तत्त्वज्ञान भुरळ घालते.

"बहिणाबाईची कविता मराठी वाङ्मयात असमान्य गणली गेली. कारण ही कविता मातीतून जन्मली होती आणि तिला तत्त्वज्ञानाची जोड होती " असे विचार चित्रपट महर्षी वसंतराव जोगळेकर यांनी बहिणाईची गाणी या पुस्तकात व्यक्त केले.

बहिणाबाईविषयी 'बहिणाबाई चौधरी' या पुस्तकाच्या मलपृष्ठावर कवी इंद्रजित भालेराव लिहितात,

"नाही अक्षरांचे ज्ञान
नाही पुस्तकाचा स्पर्श
तुझ्या कवितेचा खोपा
झुलताहे किती वर्ष"

बहिणाबाईची कविता अर्थपूर्ण आणि समृद्ध आहे. बहिणाबाईची गाणी केवळ मनोरंजनासाठी व गुणगुणण्यासाठी नाहीत, तर जीवनाचा अर्क त्यात भरलेला आहे. सृजनात्मक साहित्यातून देखील क्रांतिकारी तत्त्वज्ञान पेरता येते. हे न शिकलेल्या बहिणाबाईंनी दाखवून दिले. मुळात तत्त्वज्ञान हे काही केवळ सांगण्याची गोष्ट नाही. तर तो आचरणाचा भाग झाला पाहिजे. बहिणाबाईचे चरित्र पाहिल्यानंतर हे लक्षात येईल की, उक्ती आणि कृती याचा सुरेख संगम बहिणाबाईच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता. बहिणाबाईच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात सहजता आहे. सहजतेतून चिंतनगर्भ तत्त्वज्ञान मांडता येते, हे बहिणाबाई चौधरी यांनी दाखवून दिले आहे. म्हणून बहिणाबाई चौधरी यांची कविता आजही वाचक व अभ्यासकांना अंतर्मुख करते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved